# गोल्डन फायबर मध्ये सलग दुसऱ्या दिवशीही वादंग

## कामगारांचे काम बंद, आमदारांचा ठिय्या, मनसेने केली पोलीस तक्रार

## जवानसिंग रावत कंपनीतून तुर्तास 'गेट आऊट'

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती/ नांदगाव पेठ, ( दि.13 )**– येथील पंचतारांकित एमआयडीसीमधील गोल्डन फायबर या कंपनीमध्ये रविवारी घडलेल्या विषबाधा घटनेनंतर आठवड्याच्या पहिल्या दिवशी म्हणजेच सोमवारी गोल्डन फायबर कंपनीत वादंग सुरुच होते. येथील शेकडो कामगारांनी कंपनी व्यवस्थापनाच्या दडपशाही व हुकूमशाही विरोधात एकजूट दाखवित कामबंद आंदोलन पूकारले. दुसरीकडे आमदार राजेश वानखडे यांनी सुरक्षा अधिकारी जवानसिंग रावत वर कारवाईची मागणी करत कंपनीत ठिय्या दिला. तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते मंगेश उर्फ पप्पु पाटील यांच्या नेतृत्वात पोलीस आयुक्तांना निवेदन देवून रावत सहित इतर दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. कंपनी तुर्तास पुढचे काही दिवस जवानसिंग रावत यांना गेट आऊट म्हणजेच त्यांना पुढील आदेशापर्यंत कंपनीत पाय टाकू नये असे आदेश दिले आहे.

रविवारच्या विषबाधेच्या घटनेनंतर महिला व पुरुष कामगारांनी सोमवारी कामबंद आंदोलन केल्याने कंपनी व्यवस्थापनाचे चांगलेच धाबे दणाणले. कंपनी व्यवस्थापन, पोलीस आणि कामगार विभागाचे साटेलोटे असल्याने वारंवार याठिकाणी कामगारांवर अन्याय होत असल्याचा आरोप कामगार संघटनांनी केला. दरम्यान कामगार अधिकाऱ्यांनी मध्यस्ती करत कामगारांना न्याय देण्याचे आश्वासन देत त्यांना कामावर रुजू होण्यासंदर्भात सूचना दिल्या. अकरा अत्यवस्थ कामगारांवर अजूनही खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून रविवारी घेतलेल्या पाण्याच्या नमुन्यांचा अहवाल आज(मंगळवार) येण्याचे संकेत आहे.

रविवारी सकाळी सामान्य शिफ्ट मधील दोनशे कामगारांनी पाणी प्यायल्याने त्यांना उलटी, मळमळ व पोटदुखी होत असल्याने व्यवस्थापक रावत यांनी केवळ कंपनीची बदनामी होउ शकते यासाठी विषबाधा झालेल्या अनेक कामगारांना कंपनीमध्ये डांबून ठेवले तर ज्यांना जास्त त्रास सुरू होता त्यांना थेट घरी पाठविण्यात आले. माध्यम किंवा जिल्हा रुग्णालयापर्यंत जाऊ नये असा अलिखित आदेश देत कंपनीचे नाव समोर आल्यास कामगारांना कामावरून कमी करण्याचा धमकीवजा इशाराही रावत याने कामगारांना दिला होता.मात्र ही बाब मनसेचे पप्पू पाटील यांना माहीत पडल्यानंतरप्रकरणाचे बिंग फुटले आणि सर्व कामगारांना जिल्हा सामान्य रुग्णालयात तपासणी साठी आणण्यात आले.





### लवकरच प्राप्त होईल अहवाल ?


रविवारी घटनेनंतर जिल्हा आरोग्य अधिकारी सुरेश आसोले यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पानसे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.जुबेर अली, प्राथमिक आरोग्य केंद्र माहुलीचे डॉ. स्नेहा राऊत, डॉ. मंगला मोहोड व ईतर कर्मचारी यांनी पाण्याचे पाच वेगवेगळे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत पाठवले. त्याचा अहवाल लवकरच प्राप्त होण्याची शक्यता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वर्तविली.




### मनसे कामगार संघटनेच्या नेतृत्वात आंदोलन

मनसेचे कामगार संघटनेचे सरचिटणीस केतन नाईक, पप्पू पाटील यांच्या नेतृत्वात काम बंद आंदोलन करण्यात आले. कंपनी व्यवस्थानाशी चर्चा झाल्यानंतर दुपारी कामगार कामावर रुजू झाले. मंगळवारी जिल्हा कामगार अधिकारी यांच्या दालनात कामगार आणि व्यवस्थापन यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीमध्ये कामगारांच्या निवेदनावर चर्चा करण्यात येणार असल्याचे समजते. पप्पु पाटील यांच्या नेतृत्वात पोलीस आयुक्तांनासुध्दा निवेदन देण्यात आले. कामगार प्रतिनिधी स्वप्नील सोनपराते, मंगेश पिकले, सीमा अंबुलकर यावेळी उपस्थित होते.

### रावत कडून महिलांना शरिर सुखाची मागणी



कंपनीत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांकडून व्यवस्थापक रावत याच्याकडून शरीर सुखाची मागणी केली जात असल्याची ही तक्रार आमदार राजेश वानखडे यांना प्राप्त झाल्यावर त्यांनी कंपनीच्या कामकाजावर चांगले ताशेरे ओढले. कंपनीच्या कार्यालयात राजेश वानखडे यांचे दोन तासापेक्षा अधिकच्या काळापर्यंत ठिया आंदोलन केले. कर्मचाऱ्यांच्या मागण्या कंपनी प्रशासनाने मान्य करावे यासंदर्भातील लेखी आश्वासन त्यांनी कंपनीकडून घेतले. त्यानंतर त्यांचे आंदोलन मागे घेण्यात आलं. यावेळी भाजपचे महामंत्री नितीन गुडधे पाटील, विवेक गुल्हाने, जयंत आमले, राजू चीरडे, अनिल थुल, प्रदीप गौरखेडे, अजय गुल्हाणे यांच्यासह भाजपचे शेकडो पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# जमिनीच्या वादातून शेड पेटविले

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.13 )** – वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुरली येथे जमिनीच्या वादातून मद्यधुंद तरुणाने शेडला आग लावली. त्यामुळे एक क्विंटल मिरची, ड्रिल मशिन, कारंजे पंप, इंजिन असा 61 हजार रुपयांचा माल जळून खाक झाला. ही घटना 12 जानेवारी रोजी दुपारी 2.30 वाजता घडली. भागवतराव चिंधुजी बोहरूपी (67) यांच्या फिर्यादीवरून वरूड पोलिसांनी प्रशांत दादाराव निकम (45, रा. सुरली) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



तक्रारदार भागवतराव आणि प्रशांत हे एकाच गावातील आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून दोघांमध्ये जमिनीवरून वाद सुरू होता. 12 जानेवारी रोजी दुपारी प्रशांत निकम हे दारूच्या नशेत आला आणि शिवीगाळ करू लागला. मी तुझ्या शेडला आग लावतो' असे सांगून तेथून तो निघून गेला. त्यानंतर दुपारी 3 वाजता प्रशांतने शेड पेटवली. असे भागवतराव यांनी तक्रारीत म्हटले आहे. तक्रारीवरून वरुड पोलिसांनी प्रशांत निकम याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## थोरल्याचा धाकट्या भावावर चाकूने हल्ला

**अमरावती** – थोरल्याने धाकट्या भावावर चाकूने हल्ला करून, त्याला जखमी केले. ही घटना बडनेरा ठाण्याच्या हद्दीतील उदखेड येथे 11 जानेवारी रोजी सायंकाळी 4 वाजता घडली. उदखेड येथील रहिवासी सुशांत पुरुषोत्तम बनसोड (30) याला दारूचे व्यसन आहे. तो दारू पिल्यावर धाकटा भाऊ, आई-वडिलांसोबत वाद घालतो. त्याने क्षुल्लक कारणावरून उद्भवलेल्या वादात धाकटा भाऊ रोहीत पुरुषोत्तम बनसोड (19) याला चाकू मारून जखमी केले. या प्रकरणी रोहीतने बडनेरा ठाण्यात तक्रार दाखल केली.

# कामगाराने बांधकाम इमारतीमध्येच लावला गळफास

## छत्री तलाव परिसरातील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.13 )** – राजस्थानमधील एका तरुणाने छत्री तलाव परिसरातील इमारतीच्या बांधकामस्थळी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना 11 जानेवारी रोजी रात्री 9.45 वाजता उघडकीस आली. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. सध्या पोलिसांनी आकस्मीक मृत्युची नोंद करून तपास सुरू केला आहे. गोपीराम रत्नाराम चौधरी (22, रा. पद्मगढ, सोलंकिया ता. जोधपूर, राजस्थान) असे मृताचे नाव आहे. इसाराम रावतराम चौधरी (23, राजस्थान) यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, ते छत्री तलाव परिसरात बिल्डिंगमध्ये गेल्या 20 दिवसांपासून काम करतात. त्याच्यासोबत राजस्थानातून आलेले उमेराम चौधरी, शंभूराम चौधरी, संदाराम चौधरी आणि गोपीराम रत्नाराम चौधरी हे फर्निचरचे काम करतात. 11 जानेवारी रोजी रात्री 9.45 वाजता इसारामला त्याच्या मोबाईलवर एका तरुणीचा फोन आला. गोपीराम यांच्याशी बोलायचे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर इसारामने त्याचा शोध सुरू केला. त्यावेळी गोपीराम लोखंडी अँगलला लटकलेला दिसला. त्यानंतर इसारामने आपल्या सहकाऱ्यांना ही माहिती दिली. त्यानंतर या प्रकरणाची माहिती राजापेठ पोलिसांना देण्यात आली. राजापेठ पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. गोपीरामने गळफास घेऊन आत्महत्या का केली याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. सध्या पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# आरटीओ ची हेल्मेट रॅली 16 ला

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती ( दि.13 )**– प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत वाहनचालक मध्ये हेल्मेट बाबत जनजागृती करण्याकरिता अमरावती शहरामधून हेल्मेट रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार दिनांक 16 जानेवारीला सकाळी 9 वाजता या रॅलीला प्रादेशिक परिवहन कार्यालय येथून सुरुवात होणार आहे.

या रॅलीला प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखविण्यात येऊन रॅलीची सुरुवात करण्यात येईल. शहरातील नागरिकांनी रॅलीमध्ये आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत करण्यात आलेले आहे.

# काटी शाळेच्या टेनिक्काईट खेळ जिल्हास्तरावर

## सलग 5 वर्षांपासून घोडदौड

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.13 )**– शैक्षणिक वर्ष 2018 पासून जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक काटी शाळेचा टेनिक्काईट हा खेळ सातत्याने जिल्हास्तरावर जात आहे. राजुरा बाजार येथे झालेल्या तालुकास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सवात जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक काटी शाळेने विद्यार्थ्यांच्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. माध्यमिक मुलींच्या खेळात टेनिक्काईट एकेरी मध्ये विजय संपादन केला व दुहेरी या स्पर्धेत उपविजय प्राप्त केला. बॅडमिंटन दुहेरी मध्ये सुद्धा विजय संपादन करून जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी शाळेची चमू पात्र ठरली. प्राथमिक उंच उडी मुले मध्ये सुद्धा उपविजयी ठरली. शाळेचे खेळाडू खुशबू निंभोरकर, पायल धुर्वे, तन्वी खडसे, सोनाली घोरपडे या शाळेच्या खेळाडूंनी या क्रीडा महोत्सवात प्रतिस्पर्धी संघांचा पराजय करून शाळेला दणदणीत विजय संपादन करून दिला. विजयी खेळाडूंचे गाव पातळीवर अभिनंदन होत आहे. तसेच शाळेचे मुख्याध्यापक संजय फुटाणे, शिक्षक गजानन बिजवे, क्रीडा शिक्षक प्रदीप गणोरकर, शिक्षिका सुनीता वानखडे ,कॉन्हेट शिक्षिका कांचन कुटे यांचे सुद्धा अभिनंदन होत आहे.



# अंजनगाव बारी ग्रामपंचायतमध्ये रिक्त पदांचा बोजवारा



### रोजंदारी मजूरांवर चालतो ग्रामपंचायतीचा कारभार

## तीन वर्षांपासून चार पदे रिक्त

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी( दि.13 )** – पंचक्रोशीत मोठी ग्रामपंचायत तसेच सर्वाधिक महसूल मिळवून देणारी ग्रामपंचायत म्हणून अंजनगाव बारी ग्रामपंचायतीकडे बघितले जाते. पण गेल्या तीन वर्षांपासून या ग्रामपंचायत कारभार रोजंदारी मजूरांवर चालत असुन लिपीक, कोंडवीर, पाणीपुरवठा विभाग कर्मचारी तसेच संगणक परिचालक ( कॉम्पुटर ऑपरेटर) ही पदे गेल्या तीन वर्षांपासून रिक्त असल्याने नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

ही पदे कायमस्वरूपी भरण्याची मागणी अनेक वेळा नागरिकांनी करूनही ग्रा.पं.सचिव, सरपंच व सदस्य (सत्ताधारी व विरोधी) यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे. वेळीच जर पंचायत समिती व जिल्हा परिषद संबंधित अधिकाऱ्यांना पाठपुरावा केला असता तर रिक्त पदांचा तिढा वेळीच सुटला असता.

रोजंदारी मजूरांच्या भरवशावर ग्रा.पं.कारभार चालवणे हे नागरिकांच्या दृष्टीकोणातून चुकीचे असुन कामाला अनुभवाची कमतरता, अवेळी ये-जा करणे, वेळेवर हजर न राहणे अशा अनेक तक्रार नागरिकांकडून ऐकायला येत आहे. यावर उपाय म्हणून ही सर्व पदे कायमस्वरूपी भरणे अत्यावश्यक असुन संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर ही पदे भरण्याची मागणी ग्रामस्थांनी रेटून धरली आहे.

# शहर स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्या !

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.13 )** – स्वच्छता ही अमरावती शहरासाठी सर्वाधिक प्राधान्याची बाब असून शहरातील जो परिसर अमरावती महानगरपालिकेच्या अखत्यारित येत नाहीत, मात्र त्याचा शहर स्वच्छतेवर पर्यायाने स्वच्छतेच्या मानांकनावर परिणाम होतो, अशा विविध भागातील स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. याविषयी संबधित प्राधिकरणांनी सतर्क राहणे गरजेचे असल्याचे स्पष्ट करीत त्यादृष्टीने ठोस कार्यवाही करण्याचे व याविषयी सातत्याने पाठपुरावा करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत दिले.



याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे व इतर विभागप्रमुख उपस्थित होते. यावेळी विभागप्रमुखांनी गतआठवड्यात केलेली कामे आणि पुढील दिवसांत करायची कामे, यावर चर्चा झाली. महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागामार्फत सुरु असलेल्या कामांचा व अपेक्षित कामांचा सविस्तर आढावा घेतांना सर्व विभागप्रमुखांनी आपापल्या विभागाच्या कामांची उद्दिष्ट्ये व ती पूर्ण करण्याबाबतचे नियोजन सादर करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. नागरिकांना सुलभ रितीने सर्व लोकसेवा ऑनलाईन उपलब्ध होण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना देत ई ऑफिस तसेच इआरपी प्रणालीही संपूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याची कार्यवाही करावी असे त्यांनी निर्देशित केले. महानगरपालिकेच्या तक्रार निवारण प्रणालीव्दारे प्राप्त तक्रारींचे निराकरण विहित वेळेत होत असल्याबाबत प्रत्येक विभागप्रमुखाने खातरजमा करुन घ्यावी व प्रत्येक आठवडयात अतिरिक्त आयुक्तांमार्फत त्याचा आढावा घेण्यात यावा अशाही सूचना आयुक्तांनी दिल्या.

### उद्यानांच्या कामांसाठी अभिनव संकल्पना

महानगरपालिकेच्या विनावापर असलेली मार्केट, समाजमंदिरे व इतर सेवा इमारती वापरात आणण्याच्या दृष्टीने गतीमान पावले उचलावीत व त्याचा कालबध्द कृती आराखडा सादर करावा असेही निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले. यापुढील काळात उद्यानांची कामे अभिनव संकल्पना राबवून करावीत व पर्यटन स्थळ म्हणून त्यांचा विकास होईल याकडे विशेष लक्ष द्यावे असे त्यांनी सांगितले. उद्यानामध्ये कंपोस्टींग व्यवस्था, शौचालय व्यवस्था व पिण्याच्या शुध्द पाण्यासाठी कुलर व्यवस्था उपलब्धा करुन देण्यावर भर द्यावा अशाही सूचना आयुक्तांनी केल्या.

### प्रत्येक विद्यार्थ्यांचे आयडी तयार करा!

शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण पूर्ण करुन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी ठोस कृती करावी त्याचप्रमाणे विद्यार्थ्याची सर्व माहिती शासन पोर्टलवर संग्रहित करण्याच्या कामाला गती देऊन प्रत्येक विद्यार्थ्याचा अपार आयडी तयार करुन घ्यावा असे निर्देश देतानाच आयुक्तांनी त्यासोबतच विद्यार्थ्याची अभ्यासातील प्रगती, त्याचे छंद, त्याचा कल, त्याचे व्यक्तीमत्व याबाबत मूल्यमापन होईल अशाप्रकारे डिजीटल माहिती उपलब्ध करुन ठेवावी असे निर्देश दिले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अमरावतीत 'मिनी बांगलादेश'?

## पत्रकार परिषदेतून किरीट सोमय्या यांचे खळबळजनक आरोप



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.13 )-** भाजपा नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या किरीट सोमय्या यांनी सोमवारी( दि.13) अमरावती मध्ये पत्रकार परिषद घेत अमरावतीमध्ये मोठ्या प्रमाणात बांगलादेशी आश्रयाला असून मिनी बांगलादेशच अमरावतीमध्ये वसला असल्याचा खळबळजनक आरोप केला. सोमय्या म्हणाले, जिल्ह्यात बांग्लादेशी आणि रोहिंग्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा घोटाळा उघडकीस आला आहे. मालेगावात असाच प्रकार समोर आला होता. त्याप्रकरणी एसआयटी स्थापन झालीय. दरम्यान, अमरावतीतील अंजनगाव सुर्जी प्रकरणी अशीच एसआयटी स्थापन झालीय. अमरावती जिल्ह्याचे आकडे माझ्या हातात आहेत. भारतात जन्म-मृत्यू नोंद कायदा 1969 मध्ये अंमलात आलाय.

नव्या कायद्यानुसार जन्म प्रमाणपत्र देण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आलाय. मात्र यात मोठं षडयंत्र रचण्यात आलंय. यात शेकडो कोटी वापरण्यात आलेय. तसेच काही राजकीय पक्षांचे नेते, काही मुस्लिम नेते आणि काही एनजीओ यांच्या संगनमताने महाराष्ट्रात काही क्षेत्र निवडले. यात मालेगाव आणि अंजनगाव सुर्जीचा समावेश असून अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयातून हजारो बनावट जन्म दाखले दिल्याचा गंभीर आरोप भाजपा नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला आहे.

### काय म्हणाले जिल्हाधिकारी

सन 2023 मध्ये जन्म दाखल्याबाबत ज्या सुधारणा झाल्या, त्या सुधारणांची मानक संचालन प्रक्रिया म्हणजेच एसओपी आम्हाला जारी करण्यात आलेली नाही. त्यामूळे ज्या लोकांना जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता भासते ती प्रक्रीया आम्ही आमच्या स्तरावर करुन घेतो. त्यामध्ये वृत्तपत्रात जाहीरनामा प्रकाशित करुन आक्षेप मागविणे इत्यादी. आता काही लोकांनी जर या प्रक्रीयेचा दुरुपयोग घेवून आपल्या जन्माचे प्रमाणपत्र बनवून घेतले असेल तर त्याला कुठलीही प्रशासकीय यंत्रणा दोषी असू शकत नाही. आणि या गोष्टीमध्ये जर कुठले तथ्य नसेल तर कुणाला दोषी पकडायचे, हे सुध्दा विचार करणे गरजेचे आहे.

**सौरभ कटीयार, जिल्हाधिकारी, अमरावती.**

### बांगलादेशी आणि रोहिंग्यांना प्रमाणपत्र देणारे रॅकेट

अंजनगावात 1184 अर्जापैकी एकही अर्ज फेटाळला गेला नाही. यातील एकानेही कोणत्या ठिकाणावर जन्म झाला याचा दाखला दिला नाही. महापालिका, नगरपालिकेनं नोंद नसल्याचं सांगितलं, यालाही जन्म प्रमाणपत्रासाठी वैध ठरवलं गेलं. अमरावती महानगराची लोकसंख्या 6 लाखांत असून 4638 अर्ज आलेत, हा आकडा देशात सर्वात जास्त आहेत. यातील एकाही अर्जात जन्माचा पुरावा नाही. अचलपुरमध्ये 2657 अर्ज आलेत. यातील 2527 लोकांना प्रमाणपत्र देण्यात आलेत. चांदूरबाजारमध्ये एकही अर्ज फेटाळला गेली नाही. अमरावती जिल्ह्यात यातून आतापर्यंत 14, 643 लोकांना अर्ज आलेत. यातील 8350 लोकांना प्रमाणपत्र दिले गेलेत. यातील 50 टक्के लोकांचे अर्ज डिसेंबरमध्ये आलेत. मी अंजनगाव सुर्जीच्या तहसीलदारांशी 50 मिनिटे चर्चा केली. यावेळी त्यांना माझ्याकडे असलेले सर्व पुरावे आणि तथ्य समजावून सांगितलीत. मी या संदर्भात मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यासोबतच गृह सचिव आणि पोलिसांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना माझ्याकडची संपूर्ण माहिती दिली. त्यानंतरच मी भिवंडी मालेगाव आणि आता अंजनगाव सुर्जीला आलो आहे. अशीही माहिती किरीट सोमय्या यांनी यावेळी दिली.


### केंद्रीय गृह मंत्रालयाकडून देशपातळीवर मोहीम

बांगलादेशी आणि रोहिंग्या यांनाही प्रमाणपत्र देणारे एक मोठं रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता आहे. देश पातळीवरही हा प्रश्न अतिशय मोठा आणि महत्त्वाचा आहे. माझी माहिती ऐकून घेतल्यावर या संपूर्ण प्रकरणाची चौकशी दोन पातळीवर होणार आहे. या संदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाला अवगत केलं आहे. केंद्रीय गृह मंत्रालय देशपातळीवरही बांगलादेशी आणि रोहिंग्यांना शोधण्याचं काम आणि मोहीम हाती घेणार असल्याचे किरीट सोमय्या म्हणाले. अंजनगाव सुर्जी तालुक्यात 1100 हून अधिक बांगलादेशी व रोहिंग्या मुसलमानांना फसव्या कागदपत्रांच्या आधारे जन्म प्रमाणपत्रे दिल्याचा गंभीर आरोप सोमय्यांनी केलाये. त्यांच्या तक्रारीची दखल घेत अमरावती जिल्हा प्रशासनाने 9 जानेवारीला या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी समिती गठित केलीये. सोमय्या यांच्या अंजनगाव सुर्जी आणि अमरावतीच्या दौऱ्यानंतर या प्रकरणी वातावरण आणखी तापण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### हा वोट जिहाद

2019 पासून झालेल्या सुधारणेमुळे जे अधिकार कोर्टाला होते ते तहसीलला दिली आहेत. अमरावतीत बांग्लादेश आणि रोहिंग्यानी यांनी आपले जातीचे दाखले काढले आहेत. यात लोकसभा, विधानसभेच्या निवडणुकीत बांगलादेशी आणि रोहिंग्या मतदार सुद्धा झाले आहेत. देशातील काही एजंट त्यात काही पार्टीचे लोकं आणि काही बांगलादेशच्या बॉर्डरवरील लोक यात सहभागी होणार आहेत. अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जीमधील अनेक लोकांनी जन्माच्या दाखल्यासाठी अर्ज केले होते. त्यात कोणतेही पूर्वजांचे दाखले न देता फक्त आधार कार्ड आणि राशन कार्डच्या भरवशावर जन्माचे दाखले दिले आहेत. मी अमरावती जिल्हाधिकारी यांच्यासोबत चर्चा केल्यानंतर आज त्यांना विनंती केली की पूर्ण अर्ज पुन्हा चेक करा,त्यात जर काही कागदपत्री हे खोटी आढळली तर सर्व जन्मदाखले रद्द करा, ही आपली मागणी जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केली आहे असे ते म्हणाले.

## किरीट सोमय्या यांची तहसीलदारांशी 50 मिनिटे चर्चा



**अंजनगाव सुर्जी -** माजी खा.किरीट सोमय्या यांनी अंजनगाव सुर्जी येथील तहसीलदार यांची बनावट जन्म दाखले प्रकरणात भेट घेवून बांग्लादेशी व रोहिंग्या मुसलमान यांना बनावट जन्म दाखले प्रकरणात तब्बल 50 मिनिटे चर्चा केली. अंजनगावात बांग्लादेशी रोहिंगे वास्तव असल्याचा आरोप किरीट सोमय्या यांनी केला होता. त्याच अनुषंगाने ते आज तहसील कार्यालय अंजनगाव येथे सकाळी 10 वाजता उपस्थित झाले. जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या विशेष समिती व तहसीलदार यांच्यासोबत तब्बल पन्नास मिनिटे चर्चा केली. यामध्ये अन्य ठिकाणी त्यांना काही त्रुटी आढळल्या तो अनुभव किरीट सोमय्या यांनी समिती समोर मांडून आणि अन्य ठिकाणी कशाप्रकारे हे रॅकेट मोठ्या काम करत आहे. जे भारतीय असतील त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. परंतु रोहिंगे आढळल्यास त्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे आणि त्यांच्या कागदपत्रांची फेर तपासणीसाठी सर्व कागदपत्र पडताळणी करण्यात आली पाहिजे. त्यानंतरच असे दाखले देण्यात यायला पाहिजे. असे ते म्हणाले. भिंवडी असो,गोंवडी असो की,अंजनगाव असो की,मालेगाव असो रोहिंग्या प्रकरणात आम्ही चौकशी करण्यासाठी सर्व यंत्रणा कार्यान्वित करू असे प्रसार माध्यमाशी बोलतांना किरीट सोमय्या यांनी सांगितले. अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालय येथून तहसीलदार यांनी अशा प्रकारचे दाखले दिले त्याबाबत तहसीलदार व जिल्हाधिकारी यांचे काय करायचे ते आम्ही बघू असेही ते म्हणाले. दरम्यान देण्यात आलेल्या प्रमाणपत्राची फेर तपासणी करणार व नवीन आलेले अर्ज तपासणी केले जाईल आणि त्यामध्ये बनावट प्रमाणपत्र निघणारच अशी शक्यता त्यांनी वर्तवली. मात्र किरीट सोमय्या यांच्या वक्तव्याने तहसील प्रशासनाची झोप उडाली आहे. आणि प्रशासन खळबळून जागे झाले आहे. पोलीस प्रशासनाने कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कडक बंदोबस्त तहसील परिसरात तैनात केला होता. यावेळी किरीट सोमय्या यांच्या सोबत भाजप जिल्हा पदाधिकारी, कार्यकर्ते शहर मंडळ अध्यक्ष, माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक उपस्थित होते.

बांगलादेशी रोहिंग्या प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी समिती गठीत केली आहे. समितीद्वारे अंजनगाव तहसील कार्यालयात दाखल झालेल्या कागदपत्राची फेर तपासणीसाठी व पडताळणीसाठी कारवाई करण्यात येईल, ज्यांचे कागदपत्र योग्य असेल त्यांना दाखले मिळतील, ज्यांच्या कागदपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास त्यांना दाखला देण्यात येणार नाही व बांगलादेशी रोहिंग्य आढळल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**पुष्पा सोळंके,**
**तहसीलदार, अंजनगाव सुर्जी.**

## निवडणुकीत पराभूत झालो, तरी आरोग्य सेवेत खंड पडणार नाही - माजी मंत्री बच्चू कडू

### अचलपूर मध्ये प्रहारचे महिला आरोग्य शिबीर




**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.13 )-** प्रहार रुग्णसेवकरीता जन्मलेली संघटना आहे. अशा निवडणुका येईल व जाईल परंतु रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा म्हणून प्रहार नेहमीच रुग्णाच्या सेवेत काम करत राहील . त्याकरिता दहा वेळा जरी निवडणुकीत पडलो तरी रुग्णसेवा सोडणार नाही असे प्रतिपादन माजी आमदार बच्चू कडू यांनी प्रहार महिला संघटनेतर्फे आयोजित रोग निदान शिबिरात केले.

प्रहार महिला संघटना अचलपूर, जीवन आधार सामाजिक संस्था नागपुर व शालिनीताई मेघे हॉस्पिटल नागपूर तर्फे राजमाता जिजाऊ व आई सावित्री फुले यांच्या जयंती निमित्त 12 जानेवारी रोजी गुरुकुल पब्लिक स्कूल येथे रोग निदान व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर माजी आमदार बच्चू कडू, डॉ.जीवन जवंजाळ, मेघे रूग्णालयाचे डॉ.नरेश गिल, माजी नगर सेवक बल्लू जवंजाळ, डॉ.महेंद्र सांगोळे, संजय तट्टे, अनिल पिंपळे, प्रवीण पाटील, नितीन आगे, संतोष किटुकले, प्रिती पाटील, बोर्डी चे सरपंच मंगला चव्हाण, रसिका पणके, सांगोळे, प्रिती गाडगे, प्रतीक्षा हीवसे आणि जिजाऊ ब्रिगेड ची सदस्य उपस्थितीत होते. यावेळी जुळ्या शहरातील रुग्ण तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. प्रहार जनशक्ति पक्ष व जीवन आधार सामाजिक संस्था तर्फे या पूर्वी अचलपूर मतदार संघात 30 पेक्षा जास्त आरोग्य शिबिर राबविण्यात आले. गुरुकुल पब्लिक स्कूल मध्ये संपन्न झालेल्या भव्य रोग निदान व शस्त्रक्रिया शिबिरात गर्भ पिशवीचे रोग (वीणा टाका,दुर्बीण द्वारे ), हृदयाशी संबंधित शस्त्रक्रिया तसेच उपचार तसेच अस्थीरोग, डोळे, हृदयरोग आदी विभागांचे तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत उपचार व मार्गदर्शन करण्यात आले.

## तीन दिवसीय 52 वी जिल्हा विज्ञान प्रदर्शनी




**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,( दि.13 )** - जिल्हा परिषद अमरावती धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित श्रीमती हिराबाई गोयनका कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 52 वी अमरावती जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनी 2024-25 चे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीचा समारोपीय समारंभ व बक्षीस वितरण सोहळा शनिवारी दि. 11 जानेवारी ला धामणगाव एज्युकेशन सोसायटीच्या विद्यानिकेतन सी.बी.एस इ. स्कूलमध्ये पार पडला.

जिल्ह्यातील विविध तालुक्यातील एकूण 100वैज्ञानिक प्रतिकृतीसह विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी या प्रदर्शनात सहभाग नोंदविला होता. दि.10 जानेवारी 2025 रोजी सहा परीक्षकांनी प्राथमिक गट, माध्यमिक गट, आदिवासी गट, दिव्यांग गट तसेच प्राथमिक शिक्षक गट, माध्यमिक शिक्षक गट व प्रयोगशाळा परिचर याचे पारदर्शक मूल्यमापन केले. समारोपीय व बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळा समितीच्या अध्यक्षा डॉ. शोभादेवी राठी यांनी भूषविले. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून आमदार किरण सरनाईक, शिक्षण उपसंचालक नीलिमा टाके, शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली.

## ऑटो प्रवासात महिले जवळील रोख लंपास

**अमरावती** - ऑटो प्रवासात एका महिलेजवळील 60 हजारांची रोकड असलेली बॅग लंपास करण्यात आल्याची घटना गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत 11 जानेवारी रोजी उघडकीस आली. एका महिलेने बँकेतून 60 हजार रुपये काढले. सदर रक्कम बॅगमध्ये ठेऊन त्या ऑटोने नवसारी जाण्याकरिता निघाल्या. त्या ऑटोमध्ये दोन अज्ञात महिला बसल्या होत्या. ऑटोतून उतरल्यावर महिलेला आपल्याजवळील 60 हजार रुपयांची रोकड असलेली बॅग दिसून आली नाही. सदर अज्ञात दोन महिलांनी बॅग चोरून नेल्याचे लक्षात आल्यावर महिलेने गाडगेनगर ठाण्यात तक्रार दाखल केली.

## दिड कोटींची रोख लंपास करणाऱ्या कारचालकासह तिघांना अटक

### कोतवाली व गुन्हे शाखेची कारवाई




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती ( दि.13 )-** कॅम्प परिसरातील ग्रॅन्ड महफिल हॉटेलसमोरून कारमधील दीड कोटी रुपयांची रोख घेऊन पसार झालेल्या चालकासह त्याच्या दोन साथीदारांना अटक करण्यात आली. कोतवाली व गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने 13 जानेवारी रोजी ही कामगिरी केली. प्रवीण उर्फ पंडित शेषराव केदार (26,रा. अंढेरा तांडा, बुलढाणा), विकास बारकू वाघ (32,रा. देऊळगाव मही, बुलढाणा) व नितीन सजन इंगळे (27, रा. भानखेड, बुलढाणा) अशी अटक आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून 1 कोटी 45 लाख 71 हजार 500 रुपये रोख व गुन्ह्यात वापरलेली कार जप्त करण्यात आली. मालकाजवळील रोकड पाहून चालकाने वेळेवर आपल्या दोन साथीदारांसह चोरीचा हा प्लान रचल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले.

छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी राजेंद्र दामोदर शहा (53) व त्यांचे बिझनेस पार्टनर दिनेश प्रतापराव पाटील (55) हे दोघे 11 जानेवारी रोजी चालक प्रवीण केदार याच्यासोबत कंपनीच्या कारने अमरावतीला आले होते. ते कॅम्प परिसरातील एका हॉटेलमध्ये थांबले होते. दोघांनीही त्यांच्या मालकीचे काही प्लॉट्स वेगवेगळ्या पार्टीला विकले. त्यातून त्यांना 1 कोटी 20 लाख रुपये मिळालेत. तर, राजेंद्र शहा यांनी त्यांच्या मुलाच्या लग्नासाठी 30 लाख रुपये रोख मित्रांकडून घेतले होते. ती दीड कोटींची रोकड घेऊन ते रविवारी सकाळी छत्रपती संभाजीनगरला जाणार होते. परंतु, कारचालक प्रवीण केदार सदर रोकड घेऊन पसार झाला. या प्रकरणी राजेंद्र शहा यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास आरंभला. तपासासाठी गुन्हे शाखेसह पोलिसांची चार पथके गठित करण्यात आली. गुन्ह्यात वापरलेली कार सीसीटीव्हीत कैद झाल्याने पोलिसांनी वेळ न लावता तपासाला वेग देत घटनेनंतर काही तासांतच तिनही आरोपींना अटक केली.

### असे उडविली दिड कोटीची रोख

मालकाजवळ मोठ्या प्रमाणात रोकड बघून चालक प्रवीण केदार याची नियत फिरल्याने त्याने चोरीचा प्लान बनविला. त्यानुसार त्याने विकास व नितीन यांना कार घेऊन अमरावतीत बोलाविले. ते रविवारी पहाटे 5 वाजता अमरावतीत पोहोचले. राजेंद्र शहा व दिनेश पाटील हॉटेलमध्ये जाताच प्रवीण केदार हा रोकड व कार घेऊन थोडा पुढे गेला. रोकड विकास व नितीनला दिल्यावर तो कार घेऊन हॉटेलला परतला. कार हॉटेलबाहेर ठेवत चावी गेटमनला देऊन तो दोन साथीदारांना जाऊन मिळाला, असे तपासात समोर आले. चोवीस तासांच्या आत या गुन्ह्याचा उलगडा केल्याबद्दल पोलीस आयुक्तांनी तपास पथकांना एक लाखांचे रिवॉर्ड जाहीर केले.

## अंजली भारती यांचा प्रबोधनात्मक गीतगायनाचा कार्यक्रम आज



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि.13 )-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार उत्सव समिती चांदूर रेल्वे यांच्या वतीने फुले शाहू आंबेडकर चळवळीच्या राष्ट्रीय प्रबोधनकार कवी, गायक, भीमशाहीर भीम कन्या अंजली भारती आणि पार्टी यांचे गीत गायनाचा भव्य कार्यक्रम 14 जानेवारी रोजी सायंकाळी 6 वाजता स्थानिक जिल्हा परिषद हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित केला आहे.

मागील अनेक वर्षापासुन 14 जानेवारी नामांतर दिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार उत्सव समिती चांदूर रेल्वे हे समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन सातत्याने करीत आहे.या समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमाचा लाभ सर्व बहुजन समाजबांधवांनी घ्यावा असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार उत्सव समिती चांदूर रेल्वेचे अध्यक्ष नानासाहेब डोंगरे व उत्सव समितीचे सर्व सदस्य यांनी केला आहे.यावेळी कार्यक्रमांचे उद्घाटन म्हणून आमदार प्रताप अडसड यांची उपस्थिती राहील.

## सुधारित पद्धतीने हरभरा पेरणीकडे शेतकऱ्यांचा वाढलाय कल!

### कृषी विभागाच्या आवाहनाला यश



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि.13 )** - तालुक्यामध्ये खरीप हंगामामधील सोयाबीन व तुर पिकाची पेरणी सुधारित पट्टा पेर पद्धतीने वाढलेली आहे. त्याचबरोबर रब्बी हंगामामध्ये सुद्धा हरभरा पिकाची पेरणी सुधारित पट्टा पेर पद्धतीने वाढल्याचे दिसत आहे. त्यामुळे स्थानिक कृषी विभागाच्या आवाहनाला यश मिळत असल्याचे चित्र पहावयास मिळाले.

चांदूर रेल्वे तालुक्यामध्ये एकूण 8 हजार 749 हेक्टरवर हरभरा पिकाची लागवड झालेली आहे. त्यापैकी अंदाजे 500 हेक्टर पर्यंत सुधारित पट्टा पेर पद्धतीने हरभरा लागवड झाल्याचे दिसून येत आहे. पट्टा पेर पेरणी पद्धत म्हणजे हरभरा पिकाच्या 6 ते 7 ओळीनंतर एक ओळ रिकामी ठेवणे होय. पारंपारिक हरभरा पेरणीमध्ये शेतकरी बांधवांना काही दोष व त्रुटी दिसून आलेल्या आहेत. त्या म्हणजे पारंपारिक पेरणीमध्ये हरभऱ्याला फुलोरा आल्यानंतर त्या शेतात फिरणे अवघड जाते, पिकांमध्ये चालता येत नाही. तसेच फवारणी करणाऱ्याला फवारणी करताना अडथळे जातात, तो केव्हाही तोल जाऊन पडू शकतो. त्याचप्रमाणे स्प्रिंकलरने पाणी देतांना, स्पिंकलर पाईप टाकतांना शेतकऱ्यांना सोयीस्कर होत नाही. याशिवाय फवारणी करतांना फवारणीची सुरुवात एका ओळी पासून केल्यास शेवटपर्यंत त्याच ओळीत राहील याची शाश्वती देता येत नाही, म्हणजेच फवारणी करतांना पारंपारिक पद्धतीमध्ये काही भाग हमखास सुटतो.

परंतु सुधारित पट्टा पेर पद्धतीमध्ये हे दोष राहत नाही. 6 ते 7 ओळीनंतर एक ओळ रिकामी ठेवल्यामुळे शेतकरी बांधवांना पिकाच्या फुलोरा अवस्थेनंतरही संपूर्ण शेतामध्ये व्यवस्थित फिरता येते, तसेच फवारणी करणाऱ्याला फवारणी करतांना सोयीस्कर रित्या फवारणी करता येते. त्याचप्रमाणे स्पिंकलर चे पाईप ची मांडणी करताना सुद्धा सोपी जाते. सर्व पिकाला हवा व सूर्यप्रकाश चांगल्या पद्धतीने मिळण्यास मदत होते. आणि सर्वात मुख्य बाब म्हणजे जरी शेतकरी बांधवांनी 6 ते 7 ओळीनंतर एक ओळ रिकामी ठेवली असेल तरी उत्पन्नात कोणतीही घट दिसून आलेली नाही. त्यामुळेच चांदूर रेल्वे तालुक्यामध्ये दिवसेंदिवस सुधारित पट्टा पेर पेरणी पद्धतीने पेरणी वाढताना दिसून येत आहे. या सुधारित पेरणी पद्धती विषयी शेतकरी समाधानी असून ते या पद्धतीचे फायदे सांगताना दिसून येतात. यामागे सर्व कृषी सहाय्यकांनी मोलाची भूमिका पार पाडलेली आहे.

> मी सलग 3 वर्षांपासून माझ्या 50 एकर शेतामध्ये पट्टा पेर पद्धतीने हरभरा पेरत आहे आणि त्याचे खूप चांगले परिणाम मला दिसत आहे.
>
> **मोरेश्वर गोळे,**
> **शेतकरी, बग्गी**

> सुधारित पद्धतीने पेरणी करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. ही शेतकरी व कृषी विभागासाठी सुखद बाब आहे.
>
> **एस. एम. ढाकरे,**
> **तालुका कृषी अधिकारी, चांदूर रेल्वे**

> सुधारित पट्टा पेर पद्धतीमुळे शेतकरी बांधवांच्या 15 टक्के बियाण्याची बचत होत आहे आणि उत्पादनात 15 टक्क्यांनी वाढ होत आहे.
>
> **अमोल चौकडे,**
> **कृषी सहाय्यक तथा पेरणी मार्गदर्शक.**

## जाहीर नोटीस

अंजनगाव सुर्जी जि. अमरावती येथील (कु. स्नेहा रा. जाधव) सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी. ६५२/२०२४ ने.ता. २३/०१/२०२५

माया सुभाष पिंजरकर व इतर वय ५५ वर्षे धंदा- गृहिणी
रा. काठीपूरा, अंजनगांव सुर्जी ता. अंजतनगांव सुर्जी जि अमरावती --- अर्जदार
----वि----
निरंक --- गैरअर्जदार

याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे पती नामे सुभाष रामभाऊ पिंजरकर यांचा दिनांक ०४/०३/२०२४ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची सासू नामे शकुंतला रामभाऊ पिंजरकर यांचा दिनांक २३/०७/२०११ रोजी मृत्यू झाला आहे. नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
| --- | --- | --- | --- |
| १ | माया सुभाष पिंजरकर | वय ५५ वर्षे | पत्नी |
| २ | शुभम सुभाष पिंजरकर | वय ३७ वर्षे | मुलगा |
| ३ | सर्वेश सुभाष पिंजरकर | वय ३० वर्षे | मुलगा |
| ४ | किर्ती श्यामसुंदर घाटे | वय ३५ वर्षे | मुलगी |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

सुभाष रामभाऊ पिंजरकर हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणालाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/१२/२०२४ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय क.स्तर अंजनगांव सुर्जी जि. अमरावती**